प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई आणि डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली

# हवामानावर आधारीत कृषि सल्ला (रायगड जिल्हा)

(०२३५८) २८२३८७

अंक ७७/२०१९ दिनांक २४/०९/२०१९ कालावधी ५ दिवस

डॉ. प्रशांत बोडके,
विभाग प्रमुख,
कृषिविदया विभाग
९४२०४१३२५५

डॉ. विजय मोरे,
नोडल ऑफिसर,
कृषिविदया विभाग
९४२२३७४००१

डॉ. शितल यादव,
तांत्रिक अधिकारी
कृषिविदया विभाग
८३७९९०११६०

| मागील हवामान आठवडा सारांश (दिनांक १८/०९/२०१९ ते २४/०९/२०१९) | | | | | | | हवामानाचे घटक | हवामान पूर्वानुमान (दिनांक २५/०९/२०१९ सकाळी ८:३० पासून २९/०९/२०१९ सकाळी ८:३० वाजेपर्यंत) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १८/०९ | १९/०९ | २०/०९ | २१/०९ | २२/०९ | २३/०९ | २४/०९ | | २५/०९ | २६/०९ | २७/०९ | २८/०९ | २९/०९ |
| ५९.४ | ४३.४ | ९.२ | ५.६ | ६.४ | ०.० | ०.२ | पाऊस (मिमी) | २५ | ६५ | ३१ | १५ | १२ |
| २५.६ | - | - | - | - | - | - | कमाल तापमान (अं.से) | ३३ | ३० | २८ | ३२ | ३१ |
| २२.८ | - | - | - | - | - | - | किमान तापमान (अं.से) | २४ | २५ | २४ | २४ | २४ |
| ८ | - | - | - | - | - | - | मेघाच्छादन (ऑक्टा) | ८ | ८ | ८ | ७ | ७ |
| ९८ | - | - | - | - | - | - | सकाळची सापेक्ष आर्द्रता | ९७ | ९८ | ९८ | ९४ | ९५ |
| ८८ | - | - | - | - | - | - | दुपारची सापेक्ष आर्द्रता | ७६ | ८९ | ९१ | ७२ | ७२ |
| १.० | - | - | - | - | - | - | वाऱ्याचा वेग (किमी/तास) | ३ | ४ | ८ | ६ | ६ |
| शांत | - | - | - | - | - | - | वाऱ्याची दिशा | आ. | आ. | आ. | आ.पू. | आ.पू. |

| | पाऊस (मिमी) १/१/२०१९ पासून आजपर्यंत | पाऊस (मिमी) गेल्या वर्षीचा |
|---|---|---|
| १२४.२ | ४८२४.२ | ३५५८.३ |

## हवामान पूर्वानुमान कृषि सल्ला

**दिनांक २५ ते २९ सप्टेंबर, २०१९ पर्यंत मध्यम ते जास्त स्वरूपाच्या पाऊसाची शक्यता असून आकाश मेघाच्छादित राहील.**

**दिनांक २७ सप्टेंबर ते ३ ऑगस्ट,२०१९ साठी कोंकण विभागासाठी पर्जन्यमानाचा विस्तारित श्रेणी अंदाज हा सामान्यपेक्षा जास्त राहील.**

**सामान्य फरक वनस्पती निर्देशांक (NDVI) नुसार रायगड जिल्ह्यामध्ये वनस्पती निर्देशांक मध्यम स्वरूपाचा आणि प्रमाणित पर्जन्यमान निर्देशांक (SPI) नुसार ओलावा स्थिती दर्शविण्यात आली आहे.**

| पिक | अवस्था | कृषि सल्ला |
|---|---|---|
| भात | पोटरी ते फुलोरा अवस्था | • गरवे भात पसवण्याच्या अवस्थेत असल्याने भात खाचरात पाण्याची पातळी ५ ते १० सें.मी.पर्यंत नियंत्रित करावी.<br>• हळवे व निमगरवे भात फुलोऱ्या ते दाणे भरण्याच्या अवस्थेत असल्याने भात खाचरात पाण्याची पातळी ५ सें.मी.पर्यंत नियंत्रित करावी.<br>• पाउसाची उघडझाप व ढगाळ वातावरणामुळे पाणथळ भागात लावलेल्या भात पिकावर पाणी साठून राहिल्यामुळे निळे भुंगेरे अळीचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता असल्याने खाचरात पाणी जास्त काळ न साठता २-३ दिवसांच्या अंतराने फोडून लावावे व नवीन पाणी साठवण्याची व्यवस्था करावी. निळे भुंगेरेचा प्रादुर्भाव दिसून आल्यास नियंत्रणासाठी क्विनोलफॉस २५ टक्के प्रवाही ४० मि.ली. किंवा ट्रायझोफॉस ४० टक्के प्रवाही १२.५ मि.ली. किंवा लॅम्बडा सायहॅलोथ्रीन ५ टक्के प्रवाही ५ मि.ली. प्रति १० लिटर पाण्यातून फवारावे |
| आंबा | पालवी | • वाढत्या तापमानामुळे आंब्याला पालवी फुटण्यासाठी पोषक वातावरण असल्याने कोवळ्या पालवीचे तुडतुडे, शेंडे पोखरणारी आणि मिजमाशी पासून संरक्षण करण्यासाठी लॅम्बडा सायहॅलोथ्रीन ५ टक्के प्रवाही ६ मि.ली. किंवा क्विनोलफॉस २५ टक्के प्रवाही २५ मि.ली. प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| काजू | पालवी | • वाढत्या तापमानामुळे काजूला नवीन पालवी फुटण्यासाठी पोषक वातावरण असल्याने पालवीचे ढेकण्या व फुलकिडी पासून संरक्षण करण्यासाठी नवीन पालवी फुटण्याच्या वेळी मोनोक्रोटोफॉस ३६ टक्के प्रवाही १५ मि.ली. किंवा लॅम्बडा सायहॅलोथ्रीन ५ टक्के प्रवाही ६ मि.ली. प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.<br>• पाऊसाची उघडीप पाहून काजू बागांची गवत काढून साफसफाई करावी. वाळलेल्या, मृत आणि अशक्त फांद्या कापून विरळणी करावी व कापलेल्या भागावर बोर्डोपेस्ट लावावी. संपूर्ण झाडावर १ टक्के बोर्डोमिश्रणाची फवारणी करावी. |
| सुपारी | फळधारणा | • सुपारीवर कोळेरोग (फळगळ) बुरशीजन्य रोगाच्या नियंत्रणासाठी सुकलेली शिंपुटे, फळे आणि झावळ्या काढून बाग स्वच्छ करावी आणि पानाच्या बेचक्यात १ टक्का बोर्डोमिश्रणाची किंवा ०.३७५ टक्के कॉपर ऑक्सिक्लोराईड ३७.५ ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| दुभती जनावरे/ शेळ्या | -- | • फुलोऱ्यावर असलेल्या हिरवा चाऱ्याची मुरघास पद्धतीने साठवण करावी. |

**टीप: फवारणी ३ ते ४ तासांची पाऊसाची उघडीप असताना करावी.**

**सदर कृषि सल्ला पत्रिका डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली येथील ग्रामीण कृषि मौसम सेवा योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशीनुसार तयार करून प्रसारित करण्यात आली.**

**अधिक माहितीसाठी नजीकच्या कृषी विद्यापीठाचे केंद्र किंवा महाराष्ट्र शासनाचे कृषी अधिकारी यांच्याशी संपर्क करावा**